**नियमित दिवाणी दावा क्र. ५५/२०२०**
**नि. क्र. ४७ लगत**

**वादीतर्फे साक्षीदार क्र. ०३ प्रेमसागर हरनारायण गुप्ता यांचा उलटतपास शपथेवर, प्रतिवादीतर्फे विधीज्ञा श्रीमती पी. सी. चव्हाण यांच्याकडून –**

**(साक्षीदाराने नमूद केले की, त्याला मराठी पूर्णतः समजत नाही. तो मराठीतून बोलू शकत नाही. सबब, साक्षीदारास हिंदी भाषेतून प्रश्न विचारण्यात येत आहेत. साक्षीदाराने दिलेली उत्तरे मराठी भाषेत नोंदवून घेत आहोत. यासाठी हरकत नसल्याचे दोन्ही बाजूंचे विधीज्ञ यांनी नमूद केले. सबब, येणेप्रमाणे, साक्ष नोंदविण्यात येत आहे).**

**१५**. हे म्हणणे खरे आहे की, मला मराठी लिहिता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला मराठी वाचताही येत नाही. मला मराठी भाषा थोडी–थोडी समजते. मी माझे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र वाचले आहे तसेच आमच्या वकील साहेबांनी मला ते वाचून दाखविले आहे. मला आमच्या वकील साहेबांनी शपथपत्रातील मजकूर हिंदीतून समजावून सांगितला असे माझ्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रात नमूद नाही, हे म्हणणे खरे नाही. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या वकील साहेबांनी मला प्रतिज्ञापत्रातील मजकूर हिंदीतून भाषांतरीत करुन सांगीतल्याचे मी खोटे सांगत आहे.

**१६**. 'मला बँक ऑफ इंडीया या संस्थेमार्फत दावा दाखल करण्याचा व त्या अनुषंगाने साक्ष देण्याचा अधिकार होता व आहे' या माझ्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रातील विधानाबाबत मी कोणताही कागदोपत्री पुरावा याकामी जोडलेला नाही. रिझर्व बँकेच्या आदेशानुसार देय झालेले व्याज कर्जदाराच्या खाती खर्च लिहिलेले नसले तरी ती रक्कमही देण्यास प्रतिवादी जबाबदार आहेत, असे दर्शविण्यासाठी रिझर्व बँकेच्या आदेशाचा कोणताही दस्त मी या प्रकरणी सादर केलेला नाही.

**१७**. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २८/०२/२०१९ रोजीच्या नोटीसबाबत मला व्यक्तीशः काही माहित नाही. मी कर्ज खाते क्रमांक व कर्जदाराकडे

थकीत कर्जाची रक्कम या आता सांगू शकत नाही कारण एकाच कर्जदाराचे विविध कर्ज खाते आहेत, त्याबाबत मी दस्त पाहून सांगू शकेन. २०१८ साली माझी कडवई शाखेतून बदली झाल्यानंतर प्रतिवादीच्या कर्ज खात्यात त्यानंतर पुन्हा काय व्यवहार झालेत याबाबत मला व्यक्तीशः काही माहिती नाही.

**१८.** फौजदारी खटला क्र. १६/२०१९ बाबत मला माहित आहे. हे म्हणणे खरे आहे की, फौजदारी खटला क्र. १६/२०१९ या प्रकरणी प्रतिवादीच्या कर्जप्रकरणासंबंधीचे सर्व दस्त परीक्षणकामी मुख्य दस्तऐवज परीक्षक यांच्या कार्यालयाकडे पाठविण्यात आले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल करतेवेळी मी प्रतिवादीच्या कर्ज खात्यासंबंधीचे कोणतेही मूळ दस्त पाहिले नाही.

**१९.** हे म्हणणे खरे नाही की, कर्ज मिळण्यासाठी व्यक्ती आमच्या कडवई शाखेत येत होते त्यावेळी कर्ज मागणी अर्ज मधील मजकूर आमचे बँक कर्मचारी भरत होते, साक्षीदार सांगतो की, संबंधीत व्यक्ती वाचू अथवा लिहू शकत नसेल तर त्याबाबत तो आमच्या कर्मचाऱ्यांना सांगत असे, त्यावरुन आमचे कर्मचारी तो अर्ज भरत असत. हे म्हणणे खरे नाही की, संबंधीत व्यक्ती तो अर्ज भरत असे व तो वाचू किंवा लिहू शकत नसेल तर त्याच्या सांगण्यावरुन आमचे कर्मचारी ते लिहीत असत असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, तो अर्ज आमचे कर्मचारीच भरत असत. हे म्हणणे खरे आहे की, डिमांड प्रॉमीसरी नोट मधील मजकूर आमचे बँक कर्मचारी भरत असत.

**२०.** कर्ज मागणी व कर्ज मिळविण्यासंबंधीचे सर्व दस्त हिंदी अगर इंग्रजी भाषेतच होती, या तुमच्या सुचनेबाबत माझे सांगणे की, केवळ सोने तारण कर्जाचा अर्ज इंग्रजी भाषेत आहे, त्यातील मजकूर आम्ही संबंधीताला मराठीतून समजावत होतो. हे म्हणणे खरे आहे की, या प्रकरणातील प्रतिवादीला तसे मराठीतून समजावून सांगितले याबाबत कोणत्याही दस्तात नमूद नाही. हे म्हणणे खरे नाही की, सोने तारण

कर्ज मिळण्यासाठी संबंधीतांकडून अर्ज प्राप्त झाल्यावर त्याने दिलेल्या वस्तू सोन्याच्याच आहेत अगर कसे याबाबत पडताळणी करण्याची शाखाधिकारी म्हणून माझी जबाबदारी होती, साक्षीदार सांगतो की, त्याबाबत पडताळणी करण्याची जबाबदारी बँकेच्या अधिकृत सोनाराची होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या अधिकृत सराफावर शाखाधिकारी म्हणून माझे नियंत्रण होते.

**२१**. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादीने कर्जाची रक्कम कधीपर्यंत परतफेड केली हे माझ्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रात नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, कर्ज रकमेपैकी किती रक्कम प्रतिवादीने परत केली हे सुध्दा माझ्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रात नमूद नाही.

**२२**. हे म्हणणे खरे आहे की, तारण ठेवलेल्या वस्तू कशाप्रकारे बँकेत ठेवण्यात आल्या होत्या व त्याबाबत सुरक्षासंबंधीने काय दक्षता घेण्यात आल्या याबाबत माझ्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रात नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, तारण ठेवलेल्या सोन्याच्या वस्तू बँकेतील सेफ लॉकरमध्ये ठेवल्या जातात, साक्षीदार पुन्हा सांगतो की, कॅश व्हॉल्ट मध्ये त्या वस्तू ठेवल्या जातात. हे म्हणणे खरे आहे की, तेथे सोने ठेवते वेळी व त्यातून बाहेर काढतेवेळी कॅश व्हॉल्ट वापरण्यासंबंधी संबंधीत नोंदवहीला नोंद केली जाते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रात त्या नोंदवहीबाबत मी काही नमूद केलेले नाही.

**२३**. हे म्हणणे खरे आहे की, नियमित फौजदारी खटला क्रमांक १६/२०१९ हे प्रकरण मी दिलेल्या फिर्यादवरुन दाखल झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सोने तारण कर्जासाठी जे सोने ठेवले जाते ते संबंधीत कर्जदारासमक्ष सिल केले जाते. सोने तारण कर्जाचे नुतनीकरण करतेवेळी सुध्दा ते संबंधीत कर्जदारसमक्ष पुन्हा सिल केले जाते याबाबत माझे सांगणे की, सोने तारण कर्जाचे नुतनीकरण होत नाही. हे म्हणणे खरे आहे की, ते सिल केलेले सोने कर्जदाराच्या अनुपस्थीतीत बँक उघडू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सोने तारण कर्ज मिळणेकरीता बँकेकडे

जमा केलेल्या सोन्यावर शाखाधिकारी यांचे नियंत्रण असते, साक्षीदार सांगतो की, शाखाधिकारी व कॅशिअर किंवा कॅशिअर व ऑफीसर किंवा शाखाधिकारी व ऑफीसर अशा कोणत्यातरी दोन अधिकाऱ्यांचे एकत्रीत नियंत्रण असते.

**२४**. हे म्हणणे खरे आहे की, विविध कर्जदारांनी जे काही सोने बँकेकडे तारण म्हणून दिले आहे, ते सर्व सोने ठेवण्यासाठी आमच्या कडवई शाखेत एकच जागा होती. हे म्हणणे खरे आहे की, कर्जदाराने सर्व रक्कम बँकेकडे भरणा केल्यावर त्याला तारण ठेवलेले सोने परत दिले जाते. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी सराफाच्यासमक्ष कर्जदाराला ते परत केले जात नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी सराफाला बोलावले जात नाही.

**२५**. प्रतिवादीने बँकेकडे किती सोने गहाण ठेवले होते व बँकेने त्यास कर्ज रक्कम किती दिली होती हे मी आता सांगू शकत नाही, ते मी कागदपत्रे पाहून सांगू शकेन. त्यासंबंधी व्याजाचा दर काय होता, हे सुध्दा मी आता सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, सोने तारण कर्ज घेणाऱ्या व्यक्तिंबाबतच्या त्यासंबंधी स्वतंत्र नोंदी बँकेत केल्या जातात. हे म्हणणे खरे नाही की, एकाच दिवशी विविध व्यक्तिंनी सोने तारण कर्ज घेतले असेल तर त्या सर्वांबाबत एकच व्याजदर लागू असतो, साक्षीदार सांगतो की, कर्जदाराने घेतल्या कर्ज रकमेवर व्याजदर अवलंबून असतो त्यामुळे व्याजदर भिन्न सुध्दा असू शकतो. हे म्हणणे खरे नाही की, अशारीतीने भिन्न व्याजदर असू शकतो असे मी खोटे सांगत आहे.

**प्रश्नः** प्रतिवादीने तारण म्हणून सोन्याच्या वस्तू दिल्या होत्या, त्यामुळेच तुम्ही प्रतिवादीस सोने तारण कर्ज दिले, हे खरे का?

**उत्तरः** आमच्या अधिकृत सराफाने जे प्रमाणपत्र दिले होते त्यावरुन आम्ही सोने तारण कर्ज दिले.

हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादीस सोने तारण कर्ज देण्यात आले त्यावेळी आमचा अधिकृत सराफ म्हणून दिलीप रामचंद्र पंडीत हा होता. हे म्हणणे खरे नाही की,

अधिकृत सराफ तसेच कर्जदारावर शाखाधिकारी यांचे नियंत्रण असते. हे म्हणणे खरे आहे की, सोने तारण कर्जासाठी ज्या वस्तू दिल्या जातात त्यांचे एकूण वजन तसेच निव्वळ सोन्याचे वजन हे दोन्हीही नोंद करणे आवश्यक आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रात तारण वस्तूचे एकूण वजन व सोन्याचे निव्वळ वजन ही मापे नमूद नाहीत.

**२६**. हे म्हणणे खरे नाही की, नियमित फौजदारी खटला क्रमांक १६/२०१९ मधील जी फिर्याद मी दाखल केली ती फिर्याद दाखल करण्यापूर्वीच नमूदच्या वस्तू सोन्याच्या नाहीत असे तथाकथीतरीत्या आम्हाला वाटले होते. हे म्हणणे खरे नाही की, फौजदारी खटला क्र. १६/२०१९ मध्ये मी पोलीसांना ज्या वस्तू दिल्या त्या पैकी कोणतीही वस्तू प्रस्तुत प्रतिवादीची नाही.

**२७**. हे म्हणणे खरे नाही की, कॅश व्हॉल्ट मध्ये ठेवलेल्या वस्तू बाहेर काढल्यावर संबंधीत कर्जदारासमक्ष त्याबाबतचे सिल ओपन केले अशी नोंद नोंदवहीत घेतली जाते. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादीसमक्ष त्याने तारण ठेवलेल्या वस्तूंचे सिल काढून त्यास त्या वस्तू दाखविण्यात आल्या होत्या असे दर्शविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा आमच्याकडे नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीने तारण म्हणून ज्या वस्तू ठेवल्या होत्या त्या 'सोने' याच धातूच्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, मी दाखल केलेली फिर्याद व त्यावरुन दाखल असलेले नियमित फौजदारी खटला क्र. १६/२०१९ हे प्रकरण खोटेच आहेत.

**प्रश्नः** सोने तारण कर्ज घेतेवेळी प्रतिवादीने ज्या सोन्याच्या वस्तू बँकेकडे तारण म्हणून ठेवल्या होत्या, त्या वस्तू बँकेने आजपर्यंत प्रतिवादीस परत केलेल्या नाहीत, हे खरे का?

**उत्तरः** प्रतिवादीने तारण म्हणून ठेवलेल्या वस्तू सोन्याच्या नव्हत्या. त्या वस्तू आम्ही पोलीसांकडे दिल्या आहेत.

हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीने तारण ठेवलेल्या वस्तू सोन्याच्या नव्हत्या हे मी खोटेच सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीने तारण ठेवलेल्या वस्तू सोने या धातूच्याच असल्यामुळे व त्यांना त्या परत न मिळाल्यामुळे प्रतिवादी बँकेचे कोणतेही देणे लागत नाही.

**२८.** हे म्हणणे खरे नाही की, मी नमूद केलेला व्याजदर खोटाच आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील सर्व मजकूर खोटाच आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रातील सर्व मजकूर मला हिंदी भाषेत समजावून सांगण्यात आला असे मी प्रतिज्ञापत्रातील प्रतिज्ञालेखात खोटेच नमूद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

TARE BALIRAM DATTATRAYA
Digitally signed by TARE BALIRAM DATTATRAYA
Date: 2025.01.17 18:10:24 +0530

**(ब. द. तारे)**

दिनांक १७.०१.२०२५ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, देवरुख

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date of decision | :- | 17/01/2025 |
| Evidence signed by PO. on | :- | 17/01/2025 |
| Evidence uploaded on | :- | 17/01/2025 |